## नियमित दिवाणी दावा क्र.२७४/२०२१ मधील निशाणी २४ खालील आदेश

(सदाशिव घाडगे वि. रविंद्र घाडगे वगैरे)
*(CNR No-MHSN150014682021)*

वादीने प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ कै.सदाशिव निवृत्ती घाडगे यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेने आपोआप झालेला उपशम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

(२) वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन, वादीचे हिश्श्याचा पृथक व अलग कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादी हे अशिक्षित असलेने व कायद्याचे ज्ञान नसलेने वादी क्र.१ कै.सदाशिव निवृत्ती घाडगे हे दि.०१/११/२०२१ रोजी मयत झालेनंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर मुदतीत आणावे लागतात याबाबतची कायदेशीर प्रोसिजरची माहिती नसलेने त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेने त्यांचेविरुध्दचा दावा उपशम झालेला आहे. त्यामुळे, वादीने प्रस्तुत अर्जान्वये उपशम रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

(३) प्रतिवादींतर्फे निशानी २४ वर म्हणणे सादर करुन वादीने वारस दाखल करणेस जाणूनबुजून विलंब केला असलेबाबत कथन करुन अर्जास आक्षेप घेतला आहे.

(४) निशाणी २४ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी चे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेने त्यांचे विरुध्दचा दावा उपशम रद्द होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. वादीचा निशाणी २२ कडील विलंब माफीचा अर्ज मंजूर केलेला आहे.

दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता, तसेच, दाव्याचे स्वरुप विचारात घेता न्यायहिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

निशाणी २४ कडील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

DEEPALI SHIVAJI CHOTHE
Digitally signed by DEEPALI SHIVAJI CHOTHE
Date: 2022.03.05 18:19:19 +0530

विटा. ( दीपाली शिवाजी चोथे )
दिनांकः-०४.०३.२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा.
जि. सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad |
| Name of the Court | :- | Smt. Deepali S. Chothe,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 04.03.2022 |
| Order signed by P.O. on | :- | 05.03.2022 |
| Order uploaded on | :- | 05.03.2022 |